प्र. १. 'लघुनिबंध' या साहित्यप्रकाराच्या स्वरूपवैशिष्ट्यांची चर्चा करा. (१५)

किंवा

'पिकली पाने' या लघुनिबंधसंग्रहातून अनंत काणेकर मानवी स्वभावाचे सांगोपांग दर्शन कसे घडवितात ? सोदाहरण स्पष्ट करा.

प्र. २. 'पिकली पाने' या लघुनिबंधसंग्रहातून अनंत काणेकर यांच्या लेखनाचे कोणते विशेष आढळतात ? (१५)

किंवा

' अनंत काणेकर हे बहुश्रुत लेखक आहेत' या विधानाचा'पिकली पाने' यातील लघुनिबंधांच्या आधारे परामर्श घ्या.

प्र. ३. अ) मध्य रेल्वेचे कर्मचारी १ जानेवारी २०१६ रोजी अचानक संपावर गेले, याची चौकशी करण्यासाठी रेल्वे प्रबंधन अधिका-याला सत्यशोधन इतिवृत्त तयार करण्यास सांगितले त्या विषयीचे इतिवृत्त तयार करा. (८)

ब) ठाणे येथे 'लोकवार्ता' या नव्या दैनिकाचे प्रकाशन झाले, त्यासाठी जाहिरात तयार करा. (७)

प्र. ४. अ) उता-यावरील प्रश्न सोडवा (८)

भटेतरांच्या धार्मिक गुलामगिरीच्या थोतांडात देवळांचा क्रमांक पहिला लागतो. देवळांची उत्पत्ती ब्रम्हदेवाच्या बारशाला खास झाली नाही. हिंदू धर्माची ही अलीकडची खास कमाई आहे. देऊळ हा देवालय या शब्दाचा अपभ्रंश आहे. देवाचे जे आलय ते वसतिस्थान- ते देवालय. आमचे तत्त्वज्ञान पाहावे तो देव 'चराचर व्यापुनि' आणखी वर 'दशांगुळे उरला अशा सर्वव्यापी देवाला चार भिंतींच्या आणि कळसबाज घुमटाच्या घरांत येऊन राहण्याची जरूरच काय पडली होती ! बोरीबंदरवर उतरलेल्या नवख्या प्रवाशाला सभागृहात किवा ताजमहालात जाण्याचा जसा प्रसंग येतो तसा चराचर व्यापून 'दशांगुळे उरलेल्या देवाला सारे जग ओसाड टाकून हिंदूंच्या देवळातच येऊन ठाण देण्याचा असा कोणता प्रसंग ओढवला होता नकळे. बौद्ध धर्म हिंदुस्थानातून परागंदा होईपर्यंत (म्हणजे इसवी सनाचा उदय होईपर्यंत ) तरी भारतीय इतिहासात देवळांचा कुठेच काही सुगावा लागत नाही. मग तोपर्यंत आमचे हिंदू देव थंडीवा-यात कुडकुडत आणि उन्हातान्हात धडपडत पडले तरी कोठे होते ? विद्वान संशोधकांच्या मते आर्यांच्या ऋग्वेदकाळाची गणना जास्तीत जास्त इसवी सनापूर्वी ७००० वर्षे धरली, तर इतकी वर्षे हे आमचे मोक्षदाते देव देवळांशिवाय जगले तरी कसे आणि कोठे ? आजचा त्यांचा देवळातला थाट पहिला, तर जिवंत माणसाला एक वेळची भाकरीची पंचाईत, पण या देवांना सकाळची न्याहरी, दुपारी पंचपक्वांन्नांचे भरगच्च ताट पुन्हा तीन प्रहरी टिफीन आणि रात्री जेवण! या शिवाय दिवस सुना जायचा नाही. याशिवाय काकडआरत्या, माकडआरत्या, धुपार्त्या, शेजार्त्या आहेतच. कोट्यावधी गोरगरीब हिंदूंना विशेषतः धर्मश्रद्धाळु हतभागी अस्पृश्यांना थंडीच्या भयंकर कडाक्यात गोणपाटाचे ठिगळही मिळण्याची पंचाईत; पण आमच्या देवांना छपरीपलंग, मच्छरदाणी, गाद्या गिरद्यांशिवाय भागायचेच नाही, खुशालचेंडू श्रीमंताप्रमाणे असल्या अखंड ऐश्वर्यात लोळणा-या देवांची स्थिती देवळे निर्माण होण्यापूर्वी कशी असावी, याची प्रत्यक्ष प्रदर्शने म्हणून तर भिक्षुकशाहीच्या आद्य शंकर्चार्यांनी महारवाडे, मांगवाडे, धेडवाडे व भंगीवाडे निर्माण करून ठेवले असावेत काय ? आमची खात्री आहे की, देवळे नव्हती तेव्हा आमच्या देवांच्या नशिबी महारमांगांप्रमाणेच मसणवटीची कर्मप्रास राहणी लागलेली असावी. या राहणीतून आपला उद्धार व्हावा आणि काकडआरत्या, माकडआरत्यांचे आणि घंटानगा-यांचे ऐश्वर्य आपणास लाभावे, म्हणून आमच्या देवळ्या देवांनी भटांची खूप पायचाटी केली; तेव्हा भटांच्या वेदोक्त मेहेरबानीने त्यांना तुरुंग वजा देवळांतली भटमान्य राजविलासी राहणी लाभली.

१. देवळांची उत्पती कोणाच्या बारशाला झाली नाही असे लेखकाचे म्हणणे आहे ?

२. हिंदू तत्वज्ञानाप्रमाणे देव कसा आहे ?

३. भारतीय इतिहासांत देवळांचा पुरावा कोणत्या शतकापर्यंत मागे जातो ?

४. ऋग्वेदाचा काळ लेखक कोणता सांगतो ?

५. आरत्यांचे कोणकोणते प्रकार लेखक सांगतो ?

६. थंडीच्या भयंकर कडाक्यात गोणपाटाचे ठिगळही मिळण्याची कोणाला पंचाईत आहे ?

७. भटांच्या कोणत्या मेहेरबानीने देवांना तुरुंग वजा देवळातली भटमान्य राजविलासी राहणी लाभली, असे लेखकाला वाटते ?

८. लेखकाला योग्य शीर्षक दया.

(७)

ब) सारांशलेखन करा

आजकालचा काळ सभा, परिषदा, संमेलने यांचा आहे. राष्ट्रीय, सामाजिक व धार्मिक सभा तर प्रसिध्दच आहेत. पण याशिवाय विशिष्ट धंदेवाल्यांच्या वरजातीच्या सभाही नेहमी होत असलेल्या आपण पाहतो. हे काय तर म्हणे ग्रंथकारांचे संमेलन, ते काय तर म्हणे नाटकवाल्यांचे संमेलन। ही काय तर मुसलमानांची परिषद, ती काय म्हणे तर महार लोकांची सभा । गिरणीवाल्यांचे, तारवाल्यांचे वेगैरे संप हेही या संहतिपर चळवळीचे प्रकार आहेत. फरक इतकाच की, सभांचा प्रवृत्तीकडे आणि संपांचा निवृत्तीकडे कल दिसून येतो. या चळवळींना अलिकडे इतका उत येण्याचे कारण काय? आमच्या लोकांच्या मनात दिवसेंदिवस जुटीचे खरे महत्व चांगल्या रीतीने बिंबू लागले आहे की काय? किंवा आमची वृत्ती उत्सवप्रिय आणि या सभाही उत्सवांच्याच नमूनयावर होत असल्यामुळे आम्ही त्याकडे वारंवार आकर्षिले जात आहोत अथवा आमच्यातील तीर्थाटनेच्छू किंवा नाविन्यप्रिय मंडळींना आपली तलफ या सभांच्या निमित्ताने पुरी करता येत असल्यामुळे त्यांना इतकी गर्दी जमत असते अगर निरूद्योगी माणसांना आपला अमोलिक (म्हणजे ज्याचे मोल कवडीच्याही किंमतीचे ) नसते वेळ दवडण्याला या सभा उत्कृष्ट साधने असल्यामुळे त्यांच्याकडे इतका समूह लोटत असतो? या सभांपासून लभ्यांश पाहू गेले तर आगगाडयांचे उत्पन्न अतोनात वाढण्यापलीकडे फारसा दिसणार नाही. दूरदूरच्या सभासदांना तर या सभा म्हणजे काल व दिशा पाहाता पाहाता एकदम नष्ट करण्याचा एक उत्तम मार्गच सापडला आहे.

(१५)

प्र. ५. अ) खालीलपैकी कोणतेही पाच प्रश्न सोडवा.

१ 'पिकली पाने' हा लघुनिबंधसंग्रह कोणत्या वर्षी प्रकाशित झाला ?

२ लेखकाच्या व्यक्तिसंबंधी कोणत्या दोन संकल्पना उपयोजिल्या जातात ?

३ काणेकरांच्या लघुनिबंधसंग्रहाचे महत्वाचे कोणते वैशिष्टय नोंदविले जाते ?

४. ढालीला कोणत्या दोन बाजू होत्या ?

५. सदादुःखी माणसांचा कोणता भ्रम असतो ?

६. सत्यवादी मित्राचा कोणता स्वभावविशेष आहे?

७. 'एकाला जे अमृत ते दुस-याला विष' या निबंधात कोणत्या नाटयछटेचा उल्लेख आला आहे ?

८. सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तय:। हे सुभाषित कोणत्या नाटकातील आहे ?

९. कोणामध्ये 'स्वत्वा'ची भावना अधिक निर्भेळ आणि जाज्वल्य असते ?

१०. 'माझा स्वभाव असा आहे' या लघुनिबंधात परमेश्वर कल्पनेचे स्पष्टीकरण कसे केले आहे ?

११. पंडित लोकांचे काय सांगणे असते ?

१२. जाहिरात करताना कोणती गोष्ट टाळावी.

१३ जाहिरातीच्या माध्यमातून कोणते अप्रत्यक्ष कार्य घडत असते ?

१४. इतिवृत्ताचे महत्व सांगा.

१५. कोणत्या प्रकारचे इतिवृत्त हे तांत्रिक स्वरूपाचे असते ?